**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
**सौभाग्य मंगल कार्यालय**
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २४४ वा | शुक्रवार, दि. ०९ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# भारताच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी लष्कर आणि सरकार डगमगलं

## भारताने केली लाहौर-सियालकोट-फैसलाबाद-मुल्तानमधील डिफेंस सिस्टम उद्ध्वस्त

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** हवाई हल्ले केल्यानंतर भारताच्या नौदलाने कराची पोर्टवर हल्ला केला आहे. आयएनएस विक्रांतने हा हल्ला केला. भारताने आता जमिनीवरुन, हवेतून व समुद्रमार्गेही पाकिस्तानवर मारा सुरु केला आहे.

नागरिक उड्डाण सुरक्षा ब्यूरो (BCAS) कडून देशातील सर्व विमानतळांवर सुरक्षा वाढवण्याचे आदेश दिले प्रशासनाला आहेत. विमानतळांवर प्रवाशांची 'सेकंडरी लॅडर पॉइंट' तपासणी केली जाईल. त्याचबरोबर टर्मिनल इमारतीत प्रवाशांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच प्रत्येक विमानाच्या आत एअर मार्शलची नियुक्ती करण्यात येणार आहे. देशभरातील सर्व विमानतळांवर प्रवाशांची तपासणी दोन ते तीन वेळा केली जाईल.

### संरक्षण मंत्रालयाचे निवेदन

पाकिस्तानने केलेल्या हल्ल्याबाबत संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की, आज पाकिस्तानी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी जम्मू-काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवरील जम्मू, पठाणकोट आणि उधमपूर येथील लष्करी तळांना लक्ष्य केले. त्यांचे सर्व हल्ले परतवून लावण्यात आले. कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा नुकसान झाल्याचे वृत्त नाही. भारत आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी आणि आपल्या जनतेची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

### अरबी समुद्रालगतच्या सुरतमध्ये हाय अलर्ट जाहीर

युद्धसदृश परिस्थिती लक्षात घेता, गुजरातमधील औद्योगिक शहर सुरतमध्ये हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. अरबी समुद्राला लागून असलेल्या सुरतमधील प्रमुख औद्योगिक युनिट्स, रेल्वे स्थानके आणि विमानतळांवर सुरक्षा आणखी कडक करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अनुपम सिंग गेहलोत यांनी सांगितले की, सुरक्षा दल पूर्ण खबरदारी घेत आहेत आणि कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयारी पूर्ण करण्यात आली आहे. नागरिकांना सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### एस. जयशंकर यांचा इशारा

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी इटलीचे उपपंतप्रधान व परराष्ट्र मंत्री अँटोनियो यांच्याशी संवाद साधला. असून "आतंकवादाविरोधात भारताने घेतलेली थेट भूमिका कारवाई यावर चर्चा झाली. कोणत्याही तणावावेळी भारताकडून ठाम प्रत्युत्तराला दिले जाईल," असे ट्वीट डॉ. जयशंकर यांनी केले.

### जम्मू-काश्मीरमध्ये शाळा बंद

शुक्रवारी जम्मू आणि काश्मीरमध्ये शाळा बंद राहतील. शिक्षणमंत्री सकिना इट्टू यांनी याची माहिती दिली. त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन, शुक्रवारी बारावीपर्यंतच्या शाळांमधील वर्ग स्थगित राहतील. काश्मीर विद्यापीठ आणि इस्लामिक युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (IUST) नेही शुक्रवारचे वर्ग पुढे ढकलले आहेत.



**परराष्ट्रमंत्री यांनी साधला अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांशी संवाद**

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्याशी संवाद साधला. त्यांनी ट्वीटमध्ये म्हटले की, 'दहशतवादा विरोधातील लढ्यात भारतासोबत काम करण्याच्या अमेरिकेच्या वचनबद्धतेचे मी मनापासून स्वागत करतो.

### पाकिस्तानची डिफेंस सिस्टम उद्ध्वस्त

प्रत्युत्तराच्या कारवाईत, भारताने लाहोरमध्ये स्थित पाकिस्तानची अहअउर (एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टम) नष्ट केली आहे. याशिवाय, भारताने पाकिस्तानच्या फैसलाबाद, सरगोधा, मुलतान आणि सियालकोट शहरांमधील संरक्षण यंत्रणाही उद्ध्वस्त केल्या आहेत.

### लाहोरवर डागले क्षेपणास्त्र

भारतीय लष्कराने लाहोरमधील पाकिस्तानी लष्करी तळांवर जोरदार हल्ले केले आहेत. पाकिस्तानच्या ड्रोन हल्ल्यांना आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर देत, भारतीय हवाई दलाने लाहोरमधील महत्वाच्या तळांवर क्षेपणास्त्राने हल्ला केला आहे.

### भारताने पाकिस्तानचे चौथे फायटर जेट पाडले

भारताने प्रत्युत्तरात्मक लष्करी कारवाईत पाकिस्तानचे अत्याधुनिक एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टम (AWACS) विमान पाडले आहे. ही कारवाई भारतीय हवाई दलाने सीमेजवळ केलेल्या उच्चस्तरीय हवाई संरक्षण मोहिमेचा एक भाग होती. हे विमान पाकिस्तानच्या देखरेख आणि युद्ध नियंत्रण क्षमतेचा एक महत्त्वाचा भाग मानले जाते; ते पाडून भारताने शत्रूच्या सामरिक फायद्याचे गंभीर नुकसान केले आहे. AWACS विमान पाडल्याने पाकिस्तानच्या हवाई देखरेख आणि समन्वय यंत्रणेला मोठा धक्का बसला आहे.

### पाकिस्तानात घुसली भारतीय सेना, लाहोरवर ड्रोन हल्ला

पाकिस्तानच्या हद्दीत भारतीय सैन्य घुसले असल्याची माहिती मिळत आहे. लाहोर मधुन अफरातफरी झाली असल्याची माहती समोर येत आहे. लोक आरडाओरडा करत आहेत.घाबरुन शहराच्या बाहेर पळत आहे. शहरातील विज बंद करण्यात आली आहे. लाहोरच्या मिलिट्री तळावर हा हल्ला करण्यात आला आहे. त्यांची एअर डिफेन्स सिस्टीम बिनकामाची ठरली आहे.

### पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी हा हल्ला

गरुवारी संध्याकाळी पाकिस्तानने भारतावर हल्ला केला. पण भारताच्या एअर डिफेन्स सिस्टमने त्यांचे सर्व हल्ले परतवून लावले आहेत. दरम्यान या हल्ल्याला प्रत्यूत्तर म्हणून भारताने लाहोर शहरावर ड्रोन हल्ला केल्याची माहती मिळत आहे. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी हा हल्ला केला आहे. पाकिस्तानने भारतावर जवळपस 60 ड्रोन हल्ले केल्याची माहिती मिळत आहे. तर विमानेही हल्ले करण्याचा प्रयत्न करत होता पण भारताच्या सुरक्ष यंत्रणांनी JF-17, F-16, त्याचबरोबर आणखी एक फायटर जेट भारताने नष्ट केली आहेत.

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची महत्वाची बैठक**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पाकिस्तानबरोबर सरु झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमिवार सर्व निमलष्करी दलांच्या महासंचालकांसोबत (DG) महत्त्वपूर्ण बैठक घेतली आणि देशातील सुरक्षा स्थितीबाबत सविस्तर चर्चा केली. सीमा सुरक्षेला अधिक बळकट करण्यासाठी त्यांनी बीएसएफच्या महासंचालकांशी संपर्क साधला आणि सीमारेषेवर हाय अलर्ट जारी करण्याचे निर्देश दिले. याशिवाय, गृहमंत्री अमित शहा यांनी उकत्रचे महासंचालक आर.एस. भट्टी यांच्याशीही चर्चा केली आणि देशातील प्रमुख विमानतळांवरील सुरक्षा वाढवण्याचे निर्देश दिले. कोणतीही संभाव्य धोक्याची शक्यता लक्षात घेऊन उकत्रला विशेष सतर्क राहण्यास सांगितले आहे.

---

## सोलापूर जिल्हा बँकेवर प्रशासकाला मार्चपर्यंत मुदतवाढ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक मंडळाची निवडणूक घेण्याबाबत चार आठवड्यांत निर्णय घेण्याचा उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. या आदेशावर देखील सहकार आयुक्तांनी आदेश काढला आहे.

येत्या मार्च २०२६ पर्यंत बँकेवर प्रशासकाला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे डीसीसी बँकेवर सलग सात वर्षे प्रशासकराज राहणार आहे.

सोलापूर जिल्हा बँक संचालक मंडळाने जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या ठेवी, कर्जाच्या माध्यमातून स्वतःच्या आणि नातेवाइकांच्या संस्थांना वाटून घेतल्या. घेतलेले कर्ज कोणीही संचालक भरण्यास तयार नसल्याने बँकेच्या एनपीएत मोठी वाढ झाली. तोट्यातही वाढ झाली आणि शेतकऱ्यांना कर्जवाटपासाठी बँकेकडे पैसे राहिले नाहीत. तेच संचालक आणि वसुलीही तेच करणार असल्याने बँकेसमोरील अडचणी वाढत गेल्या. त्यातच नाबार्डच्या तपासणी अहवालात बँक आर्थिक नाबार्डच्या अहवालावर रिझर्व्ह बँकेने सोलापूर डीसीसीचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नियुक्त केले होते.

(पान 2 वर..)

**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.
**मो: ९४२२६५११०१**

## अकलूज व परिसरातील रेशन दुकाने गुन्हेगार व राजकीय लोकांच्या ताब्यात

### सामान्य नागरिक घाबरतात रेशन घ्यायला

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज व परिसरातील बहुतांश स्वस्त धान्य दुकाने, ही गंभीर गुन्ह्यात सहभागी असलेल्या, मंडळींच्या ताब्यात आहेत. त्यामुळे सदरचे स्वस्त धान्य दुकानदार, आपल्या मजीर्नुसार दुकाने उघडतात तर ओळखीच्या लोकांना माल वाटप करून, उरलेला माल काळ्या बाजारात विक्री करत असल्याची चर्चा, सध्या गोरगरीब जनतेत सुरू आहे.तसेच काही स्वस्त धान्य दुकान चालक गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे, सामान्य जनता या दुकानदारांना भांडू शकत नाहीत अथवा त्यांची तक्रार करू शकत नाहीत.

दुकानात माल विक्री करण्यासाठी बसणारे लोक हत्या, हत्या करण्याचा उद्देशाने गंभीर जखमी करणे, निवडणुकांमध्ये गोंधळ घालने, आर्थिक फसवणूक, खाजगी सावकारकी, मारामारी या सारख्या गुन्ह्यामध्ये कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जाऊन सजा भोगलेले लोक आहेत असे समजते.

शासनाने कोणत्या निकषाच्या आधारे या लोकांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना, रेशन दुकाने दिली आहेत. आमची जिल्हाधिकारी यांना नम्र विनंती आहे की या सर्व रेशन दुकानदारांची चौकशी करून, सदरची दुकाने त्यांच्याकडून काढून स्वच्छ चारित्र्याच्या लोकांना, ही दुकाने चालविण्यास द्यावीत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुंड प्रवृत्तीचे स्वस्त धान्य दुकाने चालक रेशनचां तांदूळ १५ रुपए व गहू २० रुपये दराने बाजारात विकतात असे समजते. अनेक रेशन दुकानदाराने ई-केवायसी करण्याकरिता 200 रुपये घेतल्याची चर्चा आहे.तसेच दर महिन्याला हे दुकानदार,युनिट प्रमाणे माल न देता, माल कमी देतात असेही समजले. पण सामान्य लोक यांच्या गुंडगिरीला घाबरून आवाज उठवत नाहीत. तरी मा. जिल्हाधिकाऱ्यांनी या दुकानदारांच्या, दुकानात बसून माल वाटप करणाऱ्या व्यक्तींच्या चारित्र्याची पडताळणी करावी व ही दुकाने बरखास्त करावीत असे सर्व सामान्य जनतेचे मत आहे.



### चौकशी करून कारवाई करणार - माळशिरस तहसीलदार सुरेश शेजुळ

अकलूज मधील काही स्वस्त धान्य दुकानदार गुंड प्रवृत्तीचे आहेत ते जेल मधून जाऊन आलेले आहेत, मोठ मोठ्या गुन्ह्यामध्ये त्यांचा सहभाग असताना, त्यांच्याकडे स्वस्त धान्य दुकाने कोणत्या निकषाने देण्यात आली आहेत, तसेच गरीब जनतेला वेळेवर धान्य मिळत नाही, सदरचे लोक गुंड वृत्तीचे असल्यामुळे, त्यांची तक्रार कोणी करू शकत नाहीत. याबद्दल माळशिरस तहसीलदार सुरेश शेजुळ यांना विचारले असता ते म्हणाले, स्वस्त धान्य दुकानदारांची चौकशी करून, नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तर पुरवठा अधिकारी केमकर यांना फोन लावला असता, त्यांनी फोनला प्रतिसाद दिला नाही.

## पंढरपूर विकास आराखडा: मालमत्ताधारकांनी सर्व्हेक्षणास सहकार्य करावे; प्रशासनाचे आवाहन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला आषाढी आणि कार्तिकी एकादशीला लाखो आणि दररोज मोठ्या संख्येने भाविक येतात. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी पंढरपूर विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात येत असून, 12 पथकाव्दारे मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. संबधित मालमत्ताधारकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकास योग्य माहिती देवून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

पंढरपूर येथील विकास आराखड्याबाबत स्थानिक नागरिक, व्यापारी विक्रेते, महाराज मंडळी यांच्याशी प्राथमिक चर्चा करून समस्या जाणून घेण्यासाठी केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दि. 01 मे व 02 मे 2025 रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी चर्चा केली होती. त्याअनुषंगाने प्राथमिक सर्व्हे आज गुरुवार दि. 8 मे 2025 पासून सुरु करण्यात आला आहे. सदर सर्व्हे 12 पथकाव्दारे करण्यात येत असून, या पथकात केबीपी कॉलजचे वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी, पंढरपूर नगरपालिकेचे अधिकारी- कर्मचारी यांचा समावेश आहे. सदरचे सर्व्हेक्षण प्राथमिक असून, 630 मालमत्ताधारकांचा सर्व्हे करण्यात



येणार आहे. सर्व्हेक्षणामुळे बाधित नागरिकांचे सामाजिक, आर्थिक परिणामांची माहिती गोळा होणार असल्याने, विकास आराखड्याची व्याप्ती लक्षात घेवून संबधितांना विश्वासात घेवून द्यावयाची भरपाई व पुनर्वसन याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येणार येईल. बाधितांची कमीत कमी जागा घेऊन जास्तीत जास्त लाभ कसा देता येईल याबाबतही प्रयत्न करण्यात येणार आहे.

पंढरपूर विकास आराखड्यातील बाधितांची सर्व्हे पथकाकडून संबधित मालमत्ता धारकांचे नांव, वय, जातीचा प्रवर्ग, व्यवसाय, जागेचे क्षेत्रफळ, नगर भूमापन क्रमांक, मिळकत पत्र, भाडेकरुचे नांव, कुळ, बाधित जागेचे मंदिरापासून अंदाजे अंतर, महत्वाच्या रस्तत्यापासून असलेले अंतर, बाधित जागेची दर्शनी बाजू, बांधकामाचे वर्णन व प्रकार, जागा कोणत्या कारणासाठी वापरात आहे. व्यवसायासाठी असाणाऱ्या जागेचा कधीपासून वापर करण्यात येत आहे. प्रमुख चार वाऱ्यांमध्ये व्यावसायिक वापरांतून होणारे अंदाजे उत्पन्न, संपादनामुळे बाधित होणारे उत्पन्न, पुनर्वसनाचा लाभ अपेक्षित आहे का? पुनर्वसनासाठी पसंतीचे ठिकाणे, मालमत्तेच्या अनुषंगाने मालक आणि भाडेकरु तसेच कूळ यांच्यामध्ये जागेबाबत वाद आहे का? मालमत्तेवर कर्ज गहाणखत बोजा, पुर्नवसन दरम्यान तात्पुरत्या घरांची गरज तसेच पुनर्वसन प्रक्रियेबाबत सुचना व अभिप्राय आदीबाबत माहिती सर्व्हेक्षण पथकाकडून गोळा करण्यात येणार आहे.

---

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
**सेक्स समस्या**
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

# राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार?; शरद पवारांचं सर्वात मोठं विधान, राजकीय वर्तुळात उधाण

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या राजकारणात एकीकडे ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा होत असताना दुसरीकडे ज्येष्ठ नेते शरद पवारांनी केलेल्या एका विधानामुळे राजकीय वतुर्ळात अनेकांच्या भूवया उंचावल्या आहेत.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का या प्रश्नाला उत्तर देताना हा निर्णय सुप्रिया सुळेंनी घ्यावा. मी या प्रक्रियेत नाही. सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांनी एकत्रित हा निर्णय घ्यावा असं मत पवारांनी मांडले आहे. पवारांनी पहिल्यांदाच उघडपणे या विषयावर भाष्य केले आहे.




एका इंग्रजी दैनिकाच्या मुलाखतीत शरद पवारांनी राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्यावर सविस्तर उत्तर दिले. दोन्ही बाजूचे प्रतिनिधी एकाच विचारांचे आहेत. सध्या आमच्या पक्षात दोन मतप्रवाह आहे. त्यात काही जण अजित पवारांसोबत एकत्र येण्याचे मत मांडतायेत तर काही जण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भाजपासोबत न जाण्याची भूमिका मांडत इंडिया आघाडीसोबत कायम राहण्याचं मत मांडत आहेत. परंतु इंडिया आघाडी सध्या सक्रीय नाही. त्यामुळे आम्हाला संघटनेसोबत पक्ष पुन्हा उभा करावा लागणार आहे. युवकांना सोबत घेऊन काम करावं लागणार आहे असं त्यांनी म्हटलं.

तसेच आमचा विचार विरोधात राहायचा आहे. भाजपाला पर्याय म्हणून आम्हाला उभे राहायचे आहे असं सांगत शरद पवारांनी अजित पवारांसोबत भेटीवरही खुलासा केला. राजकारणासाठी आमची भेट होत नाही. अनेक संस्था, कारखाने आहेत तिथे आम्ही एकत्रितपणे काम करतो. मग एनडीए असेल, डावे असतील, कामासाठी या भेटी होतात. सत्तेसोबत जायचे की नाही, संसदेत विरोधात बसायचे की नाही याचा निर्णय सुप्रिया सुळेंना घ्यायचा आहे असंही शरद पवारांनी स्पष्ट केले.

दरम्यान, काही कार्यकर्त्यांनी आपली इच्छा व्यक्त केली असेल म्हणून मुलाखतीत शरद पवार तसे म्हटले असतील. परंतु राष्ट्रवादी शरद पवार पक्ष पुढच्या निवडणुकांना कसं सामोरे जायचे, यावर पक्षात जयंत पाटील यांच्या स्तरावर पक्षातील नेत्यांसोबत चर्चा सुरू आहेत असं माजी मंत्री अनिल देशमुख यांनी माध्यमांना सांगितले. तर काही दुरावलेली सगळी कुटुंब एकत्र आली तर आम्हाला मनापासून आनंद होईल. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावरून शरद पवारांनी आज आशेचा किरण दाखवला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा आम्हाला सगळ्यांना मिळेल. राष्ट्रवादीची शक्तीही वाढणार आहे अशी भावना अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी म्हटलं.

## संपादकीय

# ऑपरेशन सिंदूर

काश्मीरमध्ये पहलगाम येथे 22 एप्रिल रोजी झालेल्या अत्यंत निर्घृण अशा दहशतवादी हल्ल्यानंतर पंधरा दिवसांनी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेअंतर्गत चोख प्रत्युत्तर देण्याचे काम केले आहे. भारतीय संरक्षण दलाच्या तीनही शाखांनी म्हणजे लष्कर, नौदल आणि हवाई दल यांनी 1972 नंतर प्रथमच संयुक्तपणे कारवाई करून पाकव्याप्त काश्मीरमधील आणि पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ले करून ते उद्ध्वस्त करून टाकले. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर देशभरात अत्यंत संतापाची लाट उसळली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा दहशतवादाला कायमचा गाडण्यासाठी लवकरच कारवाई करण्यात येईल अशी घोषणा केली होती.

आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच नामकरण केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानमध्ये शंभर किलोमीटर आत जाऊन लष्करी दहशतवादी तळांवर हल्ले करून दहशतवादाला गाडण्याचा प्रयत्न झाला आहे, ही निश्चितच अभिनंदनाची बाब आहे. भारत कोणत्या प्रकारची कारवाई करतो याकडे केवळ भारतातील नागरिकांचेच नव्हे तर जगभरातील देशांचेही लक्ष होते. ही कारवाई करत असताना भारताने फक्त दहशतवादी तळांनाच लक्ष केले आहे. पाकिस्तानची लष्करी ठाणी किंवा सर्वसामान्य नागरिक यांना कोणती हानी पोहोचणार नाही याची दक्षता घेतली आहे. गेल्या अनेक वर्षांच्या कालावधीमध्ये भारतातील दहशतवादी कारवायांना जबाबदार असणारे लष्कर-ए-तोयबा किंवा जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनांची मुख्यालये आणि प्रशिक्षण केंद्रे ज्या ठिकाणी होती त्याच ठिकाणी हा हल्ला करून दहशतवाद्यांना जोरदार धडा शिकवण्यात आला आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कारवाईनंतर लगेचच भारतीय संरक्षण दलांतर्फे दोन महिला अधिकार्यांनी या कारवाईची माहिती देऊन काही पुरावेही सादर केले. कारण, यापूर्वी जेव्हा दोनदा भारताने सर्जिकल स्ट्राइक आणि एअर स्ट्राइक केले होते तेव्हा भारतातीलच काही राजकीय पक्षांनीच या कारवाईबाबत शंका उत्पन्न केली होती. यावेळी मात्र भारत सरकारने संपूर्णपणे तयारी करून दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले आहे. 22 एप्रिलच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये जी बैठक झाली होती त्या बैठकीमध्ये या हल्ल्याला जबाबदार असर्णायांना शिक्षा व्हायला हवी अशा प्रकारचा ठराव मंजूर झाला होता. त्या ठरावाचाच आधार घेऊन या हल्ल्याला जबाबदार असर्णायांना शिक्षा देण्याचे काम 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने केले आहे आणि लष्कराच्या पत्रकार परिषदेमध्ये हीच गोष्ट अधोरेखित करण्यात आली. या कारवाईनंतर समस्त भारतामध्ये आनंदाचे वातावरण असले तरी आता पाकिस्तान या सर्व कारवाईला कशा प्रकारचे प्रत्युत्तर देतो यावरच भविष्य काळातील घडामोडी अवलंबून राहणार आहेत. अर्थात, गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये पाकिस्तान सातत्याने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गोळीबार करत आहे. भारताच्या या हल्ल्यानंतरही पाकिस्तानतर्फे नियंत्रण रेषेवर मोठ्या प्रमाणात गोळीबार केला जात आहे. त्यात तीन निष्पाप नागरिकांचाही मृत्यू झाला आहे. जरी भारताने कारवाई करताना पाकिस्तानमधील निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही याची काळजी घेतली असली तरी तशा प्रकारची काळजी घेण्याचे भान पाकिस्तानला नाही आणि भविष्यातही असणार नाही हे या निमित्ताने गृहीतच धरावे लागणार आहे. भारताने जर आक्रमक भूमिका घेतली तर आम्ही योग्य उत्तर देण्यास तयार आहोत अशा प्रकारचे धोरणही पाकिस्तानने स्वीकारले होते.

अर्थात भारताच्या या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यापूर्वी सर्वप्रथम पाकिस्तानला या दहशतवादी संघटना आणि त्यांचे तळ आपल्या भूमीवर कार्यरत होते याबाबत कबुली द्यावी लागणार आहे. काही वर्षापूर्वी अमेरिकेने पाकिस्तानात जाऊन ओसामा बिन लादेनचा खात्मा केला होता. तेव्हापासूनच आणि त्यापूवीर्ही पाकिस्तान हे दहशतवाद्यांचे आश्रयस्थान आहे हे जगाला माहीत झाले आहे. साहजिकच भारताने केलेल्या या कारवाईमध्ये सर्वसामान्य नागरिक ठार झाल्याचा कांगावा जर पाकिस्तानने सुरू केला असला तरी जैश-ए मोहम्मद किंवा लष्कर-ए-तोयबा या संघटनेची बांधिलकी मानणारे हाफिज सईद आणि अझहर मसूदसारखे दहशतवादी सर्वसामान्य नागरिक होते हे पाकिस्तानला प्रथम सिद्ध करावे लागणार आहे.

मुंबईवर 26 नोव्हेंबर रोजी झालेला हल्ला असो किंवा त्यापूर्वी झालेले दहशतवादी हल्ले असोत किंवा त्यानंतर झालेले किरकोळ हल्ले असोत किंवा पहलगामचा दहशतवादी हल्ला असो या सर्व हल्ल्यांचे नियोजन पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील या दहशतवादी ठिकाणांवर झाले होते. अजमल कसाब आणि डेव्हिड हेडली यासारख्या दहशतवाद्यांचे प्रशिक्षणसुद्धा या दहशतवादी प्रशिक्षण केंद्रांमध्ये झाले होते अशी माहिती भारतीय संरक्षण दलांनी उपलब्ध करून दिली असल्याने पाकिस्तानला त्याचा विचार करूनच भारताला प्रत्युत्तर द्यावे लागणार आहे.

अर्थात, पाकिस्तान हा देश उथळ राजकारण्यांच्या हातात आहे आणि या उथळ राजकारणाचे नियंत्रण लष्कराकडे असल्यामुळे कोणतेही चुकीचे साहस त्यांच्याकडून होऊ शकते हे लक्षात घेऊनच आता भारताला सावधगिरी बाळगावी लागणार आहे. केवळ प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गोळीबार करून निष्पाप नागरिकांना लक्ष करत असतानाच आणखी एखादे दुःसाहस पाकिस्तानकडून केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात, त्यानंतर पुन्हा एकदा भारत जोरदार प्रत्युत्तर देईल आणि तेव्हा भारताचे लक्ष्य पाकिस्तान आणि पाकिस्तानचे लष्कर हेच असेल हेसुद्धा विसरून चालणार नाही. आता भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंमलात आणले असल्याने पाकिस्तानची प्रतिक्रिया अपेक्षितच आहे. पाकिस्तानच्या या प्रतिक्रियेतून प्रत्यक्ष युद्धाला तोंड फुटते की नाही हे लवकरच समजेल.

पान १ वरून

## सोलापूर जिल्हा बँकेवर...

### सहा वर्षांपासून मिळतेय मुदतवाढ

त्यानुसार सोलापूर जिल्हा बँकेवर २९ मे २०१८ रोजी प्रशासक नियुक्त झाले होते. या नंतर गेल्या सहा वषार्पासून प्रशासकांना मुदतवाढ शासन देत आहे. तर प्रशासकांच्या कालावधीत बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारली, तोट्यातील बँक नफ्यात आली. एनपीए कमी झाला. ठेवी पाच हजार कोटींवर गेल्या. आता बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारल्याने संचालक मंडळाची निवडणूक घेण्याबाबत विकास सोसायट्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

### न्यायालयाच्या आदेशानांतरही निर्णय कायम

दरम्यान उच्च न्यायालयाने चार आठवड्यांत निर्णय घ्यावा; असे आदेश २४ मार्च २०२५ रोजी दिले होते. या उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी शासनाने बँकेच्या प्रशासकांना ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली असून ती कायम असल्याचा आदेश काढला आहे. अर्थात या आदेशामुळे बँकेवर सलग सात वर्षापर्यंत प्रशासक राहणार आहे.

# ९ मे महाराणा प्रताप जयंती

## महाराणा प्रताप ना कभी हारे; ना अकबर कभी जीता!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघषार्ला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप



यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणा ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दुःखी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला. वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुज्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीतीर्वंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला. आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

**Classified - छोटी जाहीरात**

**विकणे आहे**

- सोलापूर – अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर – पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर – तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची – कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## प्रबोधन

# कर्मवीर वंदू । देती ज्ञानामृत

'रयत शिक्षण संस्था' ही महाराष्ट्रातली सर्वात मोठी आणि राज्यातल्या समाजकारणावर प्रभाव पाडणारी शिक्षण संस्था आहे. रयत शिक्षण संस्थेचं बोधचिन्ह आहे वटवृक्ष. हे बोधचिन्ह निवडण्यात कर्मवीर भाऊराव पाटील तथा अण्णांनी जी प्रगल्भ कल्पकता दाखवली आहे, ती केवळ असाधारण आहे. कर्मवीर अण्णांनी महाराष्ट्रभूमीत जो ज्ञानवृक्ष लावला तो वटवृक्षासारखा अजरामर, वर्धिष्णू, छायादार आणि अनेकांचा हितकर्ता आहे, हे गेल्या काही दशकांत सिद्ध झालेलं आहे. अज्ञान, अंधश्रद्धा आणि शोषणाच्या उन्हात होरपळणाऱ्या गोरगरिबांना कर्मवीरांनी ज्ञानवृक्षाच्या शीतल छायेत आणून महाराष्ट्रावर जे अगाध उपकार केले, ते अविस्मरणीय आहेत. म्हणूनच छत्रपती शाहूंचे समकालीन प्रिन्सिपल सी.रा.तावडे या शिक्षणतज्ज्ञांनी म्हटलं आहे, 'छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील हे दोघेही कर्मवीरच! एकाने महाराष्ट्राला राजकीय स्वातंत्र्य दिलं व दुसऱ्याने खेडोपाडी शिक्षण प्रसार करून बौधिक स्वातंत्र्य दिलं!' शिवछत्रपतींनी गरीब मावळ्याच्या हातात तलवार देऊन त्याला स्वाभिमान शिकवला; तर कर्मवीरांनी आपल्या देशबांधवांच्या हातात ज्ञानाची समशेर देऊन त्याला नव्या युगाच्या समस्यांविरुद्ध लढण्यासाठी सज्ज केलं. कर्मवीर हे छत्रपती शिवरायांचे खरे वारस शोभतात.

कर्मवीर भाऊराव हे छत्रपती शाहू महाराजांच्या वसतिगृहाचे संस्कार घेऊन जेव्हा शिक्षणकार्याकडे वळले, तेव्हा त्यांनी आपले गुरू छत्रपती शाहू महाराजांचं स्मरण कृतज्ञतेने केलं. मागास जातीतला एक मुलगा घेऊन सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डिंग त्यांनी सुरू केलं. महात्मा गांधींच्या शुभहस्ते बोर्डिंगचं नामकरण करण्यात आलं. त्यावेळी गांधीजींनी विचारलं, 'शाहू महाराजांचं नाव देता, त्यांनी तुम्हाला किती देणगी दिली आहे?'

त्यावर भाऊराव म्हणाले, 'एक पैसासुद्धा नाही, पण त्यांनी मला कायार्ची प्रेरणा दिली आहे. ते माझे गुरुजी आहेत व त्यांचं मी जिवंत स्मारक करीत आहे. त्यांनी प्रत्येक जातीचं स्वतंत्र बोर्डिंग काढलं. पण मी मात्र सर्व जातींसाठी एकच बोर्डिंग काढणार आहे?'

शिष्यात इच्छेत पराजयम अर्थात, शिष्याकडून पराभव व्हावा, असा आदर्श भारतीय गुरुपरंपरा मानते. छत्रपती शाहूंना आनंद देईल, असं त्यांच्या पुढे एक पाऊल कर्मवीरांनी टाकलं होतं. धन्य तो गुरू आणि धन्य तो शिष्य!

महाराष्ट्रात अज्ञानाचं बंड मोडून काढण्यासाठी महात्मा जोतिराव फुले यांनी सन १८४८मध्ये बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी शाळा काढल्या आणि शिक्षण क्षेत्रात नवं युग अवतरलं. ज्ञानाच्या ह्या गंगोत्रीला छत्रपती शाहूंच्या कायार्मुळे गंगेसारखं थोर रूप प्राप्त झालं आणि कर्मवीरांच्या शिक्षण प्रसाराने ज्ञानगंगा गरिबा घरी अवतरली.

कर्मवीर कृतज्ञ भावनेने म्हणत असत, 'जोतिरावांनी मला समाजसुधारणेचा कानमंत्र दिला. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे तथा अण्णासाहेब शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्याची आणि स्त्री शिक्षणाची दीक्षा दिली. शाहू छत्रपतींच्या स्फूर्तीवर माझा बंडखोरीचा पिंड पोसला आणि गांधीजींच्या सत्य-अहिंसेने मी राष्ट्रकार्याकडे वळलो.'

महात्मा फुले यांनी जी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, ती शोषणमुक्त समाजनिर्मितीचं उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून केली होती. समाजाचं शोषण करण्याच्या दुष्ट हेतूमुळेच ब्राह्मणांनी क्षत्रिय-वैश्य-शूद्रांनी शिक्षण घेण्याची बंदी केली होती. छत्रपती शाहूंनी शिक्षणकायार्ला प्राधान्य दिलं होतं. कारण त्यांना ब्राह्मणी शिक्षण निर्बंध मोडून काढायचे होते.

कर्मवीरांनी जेव्हा किर्लोस्कर, ओगले आणि कपूर यांच्याकडे काम करणं बंद केलं, तेव्हा शेठजी आणि भटजी यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवताना भाऊराव म्हणाले, 'आजपासून मी सर्वस्वी रयत शिक्षणास वाहून घेत आहे व माज्या दाढीत जितके केस असतील, त्यापेक्षा अधिक रयतेची मुलं-मुली मी शिकवून तयार करणार व समाज शोषण करणाऱ्यांच्या छाताडावर थयथय नाचायला लावणार.'

कर्मवीरांनी आपली प्रतिज्ञा खरी करून दाखवली. महाराष्ट्राच्या चौदा जिल्ह्यांत ४० महाविद्यालयं, पाचशे माध्यमिक हायस्कूल, अध्यापक महाविद्यालयं, अनेक वसतिगृहं असा अण्णांच्या कायार्चा वटवृक्ष चारी दिशांनी फोफावत चालला आहे. संपूर्ण आशिया खंडात रयत शिक्षण संस्थेचं कार्य अद्वितीय असल्याचं सिद्ध झालं आहे.

राजर्षी शाहूंनी सत्यशोधक चळवळीस हार्दिक पाठिंबा दिल्यामुळे कर्मवीर अण्णांनी या चळवळीत तन-मन-धन वेचलं. केशवराव जेधे यांच्या सत्यशोधकी जलशात भाऊरावांनी आपल्या पहाडी आवाजात सत्यशोधकी जलशाची गाणी गायिली. प्रबोधनाची ही चळवळ त्यांना खूप उपयोगी पडली. परिणामी, सर्व समाज कर्मकांड, भटी थोतांड, पूजा अर्चादि उपद्व्यापातून बाहेर पडून शिक्षण घेण्या-देण्यामागे लागला. प्राचार्य भगत म्हणतात, 'साताऱ्याच्या ज्या धनिणीच्या बागेत अण्णांनी वसतिगृह सुरू करून शिक्षणकार्य सुरू केलं, ते स्थान आधुनिक महाराष्ट्राचं तीर्थक्षेत्र आहे.'

संत गाडगे महाराज म्हणतात, 'भाऊरावांनी शैक्षणिक मंदिरं उभारली आहेत. जिवंत देवाची, सगुणरूप परमेश्वराची ते उपासना करत आहेत. तेथेच पांडुरंगाचं अधिष्ठान आहे.'

आज धंदेवाईक शिक्षणसम्राट आपल्या शिक्षण संस्थांच्या आवारात चिलीमबाज गजानन महाराज, नंगे राहाणारे स्वामी समर्थ आणि वेडापीर साईबाबा यांची मंदिरं उभी करून ज्ञानक्षेत्र प्रदूषित करीत आहेत. त्यांनी गाडगे महाराजांचे शब्द समजून घेऊन कर्मवीरांच्या जाति-धर्म-पंथमुक्त वर्तनाचा विचार करणं गरजेचं आहे. शिक्षण देणं म्हणजेच गोरगरिबांची सेवा करणं, अशी ठाम भूमिका असलेल्या कर्मवीरांनी आपल्या शिक्षणसंस्थाच्या पावित्र्याबद्दल बोलताना तांबुलभक्षक थुंक्या लोकांविषयी सात्त्विक संतापाने म्हटलं, 'हं, सांगा पाहू कोण कोण लेकांचे पान-तंबाखू खातात ते! माझी संस्था म्हणजे काही सार्वजनिक खानावळ नाही. ते ज्ञानाचं देऊळ आहे. तुम्ही या प्रकारे या ज्ञानमंदिरात राहाणार असाल, तर मला असल्या उपासकांचा उपहास करावा लागेल.'

पंढरपूरच्या रयत शिक्षण संस्थेत 'सरस्वती'ला विराजमान करणाऱ्यांनी कर्मवीरांचं अपेक्षित 'ज्ञानाचं देऊळ' कसं होतं, ह्याचा अभ्यास केला पाहिजे.

भाऊराव पाटील यांच्यासारख्या थोर तपस्वी त्यागी शिक्षण प्रसारकाचा महाराष्ट्राला पुरोगामी, बुद्धिनिष्ठ बनवण्यात सिंहाचा वाटा आहे. त्यासाठी लक्षात असू द्या-

झोपडीच्या दारी । ज्ञान भागीरथी
कर्मवीर नेती । स्वकष्टाने ॥१
ज्ञानप्रसार हा । एकमेव ध्यास
शिक्षण हा श्वास । त्यांचा झाला ॥२
ज्ञानबीजे दिली महात्मा फुलेंनी
राजर्षी शाहूंनी । दिली रोपे ॥३
गाव तेथे रोप । अण्णांनी लावले
प्रेमे वाढविले । ज्ञानवृक्ष ॥४
भकास खेड्यांचे । होई नंदनवन
आले आत्मभान । शोषितांना ॥५
सुख-समृद्धीने । खेडी झाली धन्य
खरे लोकमान्य । होते अण्णा ॥६
परमपिता अण्णा । देवाहून थोर
धन्य महाराष्ट्र । त्यांच्या कार्ये ॥७
कर्मवीरा वंदू । देती ज्ञानामृत
चैतन्य देशात । संचारते ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचारी यांचा आकृतीबंध तयार करणार - गुलाबराव पाटील

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांना न्यायालयाचे आदेशानुसार सेवेत कायम करणेची मागणी राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांचे कडे भेटून करणेत आली. याबाबत मुंबई येथे विशेष बैठकीचे आयोजन करून कंत्राटी कर्मचारी यांचा आकृतीबंध तयार करणेत येणार असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

सोलापूर येथील हॉटेल बालाजी सरोवर येथे राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील आले असता राज्य कृती समितीचे कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी भेटून निवेदन देऊन विविध प्रश्न मांडले. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, महाराष्ट्र जीवन प्राधीकरणचे कार्यकारी अभियंता प्रविण पाटील, उप अभियंता देशपांडे, संघटनेचे खजिनदार शंकर बंडगर, सचिन सोनवणे, महादेव शिंदे प्रमुख उपस्थित होते.

हॉटेल बालाजी सरोवर येथे कॅत्राटी कर्मचारी यांचे प्रश्नावर चर्चा करणेत आली. मंत्री गुलाबराव पाटील यांचा तुळशीचा हार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला. कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड, कार्याध्यक्ष सचिन जाधव, उपाध्यक्ष ऋषीकेश शिलवंत, उपाध्यक्ष बंडू हिरवे यांचे वतीने हे नमवेदन दिले आहे.

गेल्या १० ते २० वर्षापर्यंत कार्यरत कंत्राटी कर्मचारी असून त्यांच्या अनुभवाचा व कामकाजाचा उपयोग पाणी पुरवठा स्वच्छता विभागाला पूर्वीपासून झालेला आहे. सदर कर्मचारी यांना कायमस्वरूपी



सेवेत समाविष्ट करणेबाबत मा.उच्च न्यायालय हायकोर्ट यांनी आदेश दिले आहेत.या प्रमाणे सदर कर्मचारी यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेणेत यावे तसेच सदर कर्मचारी यांचे मानधन समान काम समान काम वेतनानुसार वाढविणेत यावे व सदर कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करणेसाठी आपले स्तरावरून योग्य ती कार्यवाही व्हावी अशी मागणी पाणी पुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्याकडे केली निवेदनाद्वारे केली आहे

### कायम करणेसाठी आकृतीबंध हा पहिला टप्पा - मंत्री गुलाबराव पाटील

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांना न्यायालयाचे आदेशानुसार सेवेत कायम करणेसाठी पहिल्या टप्प्यात कंत्राटी कर्मचारी यांचा आकृतीबंध तयार करणार असून याबाबत दोन बैठका घेणेत आलेले आहेत. बीआरसी व सीआरसी यांचा पगार वाढ केला आहे. त्याच धर्तीवर जिल्हा स्तरावर कार्यरत कर्मचारी यांचा देखील पगारवाढ करणे बाबत बैठक घेणेत आलेली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांचे प्रश्न मार्गी लावणार असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

### कंत्राटी कर्मचारी यांना कायम करा- कार्याध्यक्ष सचिन जाधव

राज्यात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत कंत्राटी कर्मचारी गेल्या २० वर्षी पासून कायम आहेत. छत्रपती संभाजीनगर च्या मॅट न्यायालयाने कायम करणेचा निकाल दिला आहे. शासनाने अंमबलबजावणी करावी. आकृतीबंध तयार करावा. पद अस्तित्वात असे पर्सत कर्मचारी यांना कायम करावे. पगार वाढ करावी. अशी मागणी कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी केली आहे.

## वात्रटिका

### भारत की बेटियाँ

आम्हाला अभिमान आणि
त्यांना संदेश दिला आहे...
बघ जरा डोळे उघडून इथं
सर्वधर्म समभाव रुजला आहे...
सोफिया आणि व्योमिका
यांनी ह्रदय आमचं भरलं...
जगाला यांनीच सांगितलं
घरात घुसून कसं मारलं...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# टेंभू चे पाणी माण नदीत १० मे ला दाखल होणार : आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** प्रतिनिधी टेंभू सिंचन योजनेतून माण नदीमध्ये शेतकऱ्यांच्या पिकासाठी उन्हाळी सिंचन आवर्तन सोडण्याकरता आज मुंबई येथील मंत्रालयात जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी भेट घेतली. यावेळी मंत्री महोदयांशी बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू सिंचन योजनेतून माण नदीमध्ये शेतकऱ्यांच्या पिकासाठी उन्हाळी सिंचन आवर्तन लवकरात लवकर सोडण्याची आग्रही मागणी केली. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने पिण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला असून त्यामुळे तालुक्यातील गावांना शेती पिकासाठी सिंचन उपलब्ध करून नियोजनबद्ध पद्धतीने आवर्तन लवकरात लवकर सोडण्यात यावे अशी आग्रही मागणी आज आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली. त्यावर जलसंपदा मंत्री मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना शनिवार दि. १० मे पासून शेतकऱ्यांसाठी पीक सिंचन आवर्तन सुरू करण्याचे आदेश दिले. मंत्री महोदयांनी तत्काळ सकारात्मकता दर्शवत पाणी सोडण्याचे आदेश दिल्याने आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

# महेश पिंगळे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त 60 दात्यांनी केले रक्तदान

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथील महेश बापू पिंगळे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरामध्ये तब्बल 60 रक्तदात्यांनी रक्तदान केले, पंढरपुर येथील पंढरपूर ब्लड बँकेने रक्त संकलन केले. तसेच या रक्तदान शिबिरा नंतर प्रत्येक रक्तदात्यास फळांची झाडे भेट देण्यात आली वृक्षारोपण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले, याचे सर्वच स्तरांमधून कौतुक होत आहे व हा एक आगळा वेगळा उपक्रम राबवला गेल्याचे बोलले जात आहे. सदर रक्तदान शिबिर ई. दहावीतील वर्गमित्र ग्रुप यांच्यावतीने आयोजित केले होते तसेच झी टॉकीज फेम कविराज महाराज झावरे यांचे सुश्राव्य असा कीर्तन सोहळा पार पडला यामध्ये टेंभुर्णी व परिसरातील सर्व नागरिक, नातेवाईक आणि महेश बापू चा मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




कै.महेश बापू पिंगळे यांच्या मित्र परिवारातील मनोज नांगरे यांची नुकतीच चव्हाणवाडी गावच्या सरपंच पदी निवड झाल्याबद्दल ही सत्कार महेश बापूंचे वडील दादा पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आला

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश पिंगळे शिवाजी भैय्या येवले पाटील, पांडुरंग चिवडे, जाफर तांबोळी, डॉ. सुहास अनंतकवळस अजित बेसुळके, सुनील कुठे, औदुंबर घळके, संतोष लाटणे, सचिन तांबे अमोल ताबे सुयश शहा, सुनील पवार, सिद्धेश्वर गणगे, दीपक वाघमोडे संभाजी देशमुख, सिद्धेश्वर शिंदे, समाधान माने अनिकेत चौगुले, शशिकांत पवार महेश तरटे, श्रीकांत जाधव सुधीर पाठमास सचिन पाठमास सुनील सुक्रे नितीन कदम, प्रवीण येवले पाटील आणि महेश बापू मित्रपरिवार, इयत्ता दहावी वर्ग मित्रपरिवार आणि कोटक महिंद्रा बँक मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.

# सम्यक प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती वाटप संपन्न, संवैधानिक मूल्ये जपणारा समाज निर्माण झाला पाहिजे - किरण बनसोडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "भारतीय संविधान हे केवळ कायद्याचं पुस्तक नसून, एक मूल्याधारित जीवनशैली आहे. आजच्या काळात सामाजिक सलोखा, समता, बंधुता आणि न्याय यांची जपणूक होणे अत्यावश्यक असून त्यासाठी संवैधानिक मूल्य जपणारा समाज निर्माण झाला पाहिजे" असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांनी केले. ते सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या सम्यक प्रज्ञाशोध परीक्षेच्या शिष्यवृत्ती वाटप समारंभ प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर हे होते. विचारमंचावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती मुंबईचे अध्यक्ष शशिकांत जाधव,युवा उद्योजक अमोल शिंदे, पुरातत्व विभाग मुंबईचे सुरेंद्र शेंडे,दूरदर्शनचे निवृत्त अधिकारी कपिल ढोरे,भागवत कुवळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलताना शशिकांत जाधव म्हणाले की, सोलापूरची भीम जयंती ही देशभरात प्रसिद्ध असून ही जयंती विचारांचा जागर करून साजरी करण्याचा सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशनचा उपक्रम स्तुत्य आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना भालशंकर म्हणाले की, जयंती हा विचारांचा महोत्सव असतो.सम्यक प्रज्ञा शोध परीक्षेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिशा मिळत असून अनेक विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला आहे.

एकूण रुपये 25,000/- शिष्यवृत्तीचे वाटप यावेळी करण्यात आले.कार्यक्रमासाठी सविता कुवळेकर, लोकराजा फाउंडेशनचे अध्यक्ष आशुतोष तोंडसे, प्रा.पल्लवी मेश्राम यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन सम्यक अकॅडमीचे मार्गदर्शक राज्यकर निरीक्षक बुद्धजय भालशंकर यांनी केले तर निर्मला मौळे यांनी सर्वांचे आभार मानले.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)** smcphewtr@gmail.com

जा.क्र.साआअ/जल/१५८ **तिसरी मुदतवाढ** दि.०७/०५/२०२५

सोलापूर म.न.पा.चे विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणेकरीता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वसती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे तिसरी मुदवाढ देण्यात आली आहे.

1)Tender ID-2025-SMC-1171591_1, 2)Tender ID-2025-SMC-1171434_1, 3)Tender ID-2025-SMC-1171604_1, 4)Tender ID-2025-SMC-1171637_1, 5)Tender ID-2025-SMC-1171653_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.०७/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**
**फोन क्र.(०२१८६)२२३२५३,२२३०१३,२२३१८७ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६**
**ई मेल:-** comcpandharpur@gmail.com

जा.क्रं./पंनपं/न.अ./२३४९/२०२५ दिनांक:०८/०५/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

याद्वारे सबंधित क्षेत्रातील अधिकृत, नोंदणीकृत मक्तेदारांना / पुरवठादार यांना कळविण्यात येते की, पंढरपूर शहरातील पंढरपूर शहरातील गट नं.४७/४७ मनीषा नगर (सुनिल उबरे घराजवळ) ओपन स्पेस सुशोभिकरण करणे हे काम नगरपरिषदेने हाती घेतलेली आहेत. यामध्ये सदर ठिकाणी 1) Slides playground 2) Swings 3) Cricular swing 4) Childern round climber 5) Platfrom merry ground 6)Kids jumping trampoline 7) Animal merry ground 8) Arm & Paddle bike outdoor gym cycle piece 9) Sky walker 10) Double chest press outdoor gym 10) Chest shaper 11) Led pres outdoor gym equipment 12) Bony rider outdoor gym equipment 13) Body maxx heavy duty air walker इत्यादी खेळणी व जीम साहित्य बसविण्याचे काम करावयाचे आहे. सदरचे काम शासनाच्या योजनेतून प्रस्तावित करावयाचे सदर बाबीचे आहे. या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही बांधकाम विभागाकडे चालू आहे. तरी याकामी शासनाच्या मंजूर दरसुची मध्ये नमूद नसणाऱ्या बाबीची अंदाजपत्रकात समावेश करण्यासाठी बाजारभावाप्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर साहित्याचे Specifications जाहिर प्रसिध्दीकरण कालावधी मध्ये नगरपरिषद बांधकाम विभागामध्ये पाहावयास मिळतील. सदर Specifications नुसार उपरोक्त कामाबाबत कोणास दर पत्रक द्यावयाचे असतील त्यांनी इकडील बांधकाम विभागाकडे समक्ष संपर्क साधून आवश्यक बाबीची माहिती घेवून त्याचे जीएसटी (GST) वगळून दरपत्रक दिनांक- १५/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात बारनिशी विभागाकडे समक्ष सादर करण्यात यावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**(डॉ. प्रशांत जाधव)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**
**फोन क्र.(०२१८६)२२३२५३,२२३०१३,२२३१८७ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६**
**ई मेल:-** comcpandharpur@gmail.com

जा.क्रं./पंनपं/न.अ./२३२८/२०२५ दिनांक:०८/०५/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

याद्वारे सबंधित क्षेत्रातील अधिकृत, नोंदणीकृत मक्तेदारांना / पुरवठादार यांना कळविण्यात येते की, पंढरपूर शहरातील पंढरपूर शहरातील बालाजी नगर गट नं. ४२१ ओपन स्पेस विकसित करणे हे काम नगरपरिषदेने हाती घेतलेली आहेत. यामध्ये सदर ठिकाणी 1) Slides playground 2) Swings 3) Cricular swing 4) Childern round climber 5) Platfrom merry ground 6) Kids jumping trampoline 7) Animal merry ground इत्यादी खेळणी बसविण्याचे काम करावयाचे आहे. सदरचे काम शासनाच्या योजनेतून प्रस्तावित करावयाचे आहे. या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही बांधकाम विभागाकडे चालू आहे. तरी याकामी शासनाच्या मंजूर दरसुची मध्ये नमूद नसणाऱ्या बाबीची अंदाजपत्रकात समावेश करण्यासाठी सदर बाबीचे बाजारभावाप्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर साहित्याचे Specifications जाहिर प्रसिध्दीकरण कालावधी मध्ये नगरपरिषद बांधकाम विभागामध्ये पाहावयास मिळतील. सदर Specifications नुसार उपरोक्त कामाबाबत कोणास दर पत्रक द्यावयाचे असतील त्यांनी इकडील बांधकाम विभागाकडे समक्ष संपर्क साधून आवश्यक बाबीची माहिती घेवून त्याचे जीएसटी (GST) वगळून दरपत्रक दिनांक - १५/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात बारनिशी विभागाकडे समक्ष सादर करण्यात यावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार ला जाणार नाही.

**सही/-**
**(डॉ. प्रशांत जाधव)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

**अकलूज नगरपरिषद,अकलूज**
**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**
**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**
Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्रं./२१६/अनप/२०२५ दिनांक :-०८/०५/२०२५

**अकलूज नगरपरिषद, अकलूज**
**सन २०२५-२६**

अकलूज नगरपरिषेदे मार्फत स्थानिक रस्ते अनुदान अंतर्गत सन २०२५ - २६ साठी विकास कामांसाठी योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणाली द्वारे निविदा मागवण्यात येत आहे. कोऱ्या ई-निविदा नमुना https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ०९/०५/२०२५ ते १६/०५/२०२५ या कालावधीमध्ये उपलब्ध राहिल. सदर कामाची ई-निविदा कंत्राटदाराने https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक:- १६/०५/२०२५ रोजी दुपारी ५:०० वाजेपर्यंत सादर करावे. सदर कामाची निविदा शक्य झाल्यास दिं. १९/०५/२०२५ रोजी दुपारी उघडण्यात येतील.

**सही/-**
**(दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**

**अकलूज नगरपरिषद,अकलूज**
**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**
**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**
Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्रं./२१७/अनप/२०२५ दिनांक :-०८/०५/२०२५

**अकलूज नगरपरिषद, , अकलूज**
**निविदा सूचना सन २०२५-२०२६**

अकलूज नगरपरिषदे मार्फत अंतर्गत खालील कामाकरिता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहर बंद निविदा दि. ०९/०५/२०२५ ते १६/०५/२०२५ दु.५:०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. ०९/०५/२०२५ ते १६/०५/२०२५ पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

| अ.क्र. | तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किमंत | कामाचा कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील दिपक सुतरावे घर, शनीमंदिर बॅक साइड व देशमुख वाडा समोर, महर्षि कॉलनी या ठिकाणची गटर दुरुस्ती करणे. | ३,०१,०८४/- | ४०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | १०० दिवस |
| ०२ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील (विजय चौक ते आझाद चौक) येथे कॉक्रीट रस्ता दुरूस्ती करणे. | १,६७,०९८/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | १०० दिवस |
| ०३ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील जोशी गल्ली या ठिकाणची गटर दुरुस्ती करणे. | २,४३,५५३/- | ३०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | १०० दिवस |
| ०४ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील कुंभार घाट या ठिकाणची गटर व रस्ता दुरुस्ती करणे. | १,५५,२७८/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | १०० दिवस |
| ०५ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील मदरसा समोरील गटर दुरुस्ती करणे. | ३,२४,१५८/- | ४०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | १०० दिवस |

वरीलप्रमाणे कामा करिता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. ०९/०५/२०२५ ते १६/०५/२०२५ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाना रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केली जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषेदेने राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**(दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**

